# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
# कृषि नगर, परभणी (महाराष्ट्र) ४३१ ४०२

---

## विद्यापीठ प्रकल्पग्रस्त विशेष जाहिरात-२०२५

क्र. वनामकृवि/सा.प्र.वि./जाहिरात क्रमांक-२/२२९७/२०२५/ दिनांक :- ०१.०७.२०२५

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी करीता ज्या स्थावर मालमत्ता धारकांनी प्रत्यक्षात या कृषि विद्यापीठाकरीता जमिनी / घरे शासन धोरणानुसार अधिगृहीत केलेल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्तामधुन शासन निर्णय दिनांक १४ ऑक्टोंबर २०२४ नुसार कृषि विद्यापीठातील **गट क व गट ड** संवर्गातील एकुण भरावयाच्या पदांपैकी ५० टक्के रिक्त पदे त्याच कृषि विद्यापीठांने बाधीत प्रकल्पग्रस्तांमधुन भरण्याकरीता विशेष भरती प्रक्रिया राबविण्यास एक विशेष बाब म्हणून परवानगी देण्यात आलेली आहे.

सदर शासन निर्णयान्वये तसेच भरती प्रक्रिये संबंधी प्रचलीत शासन निर्णय, वेळोवेळी निर्गमित शासन निर्णयातील तरतुदीनुसार वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी (महाराष्ट्र राज्य) अंतर्गत प्रकल्पग्रस्त सरळसेवा विशेष भरती मोहीमे अंतर्गत सोबतच्या विहित नमुन्यामध्ये पात्र उमेदवाराकडून ऑफलाईन पध्दतीने अर्ज खालील वेळापत्रकाप्रमाणे मागविण्यात येत आहे. सदरील सविस्तर जाहिरात व आवेदन पत्राचा नमुना विद्यापीठ संकेतस्थळ www.vnmkv.ac.in वर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

**अर्ज सादर करण्याचे वेळापत्रकः-**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १. | आवेदन पत्र / शुल्क भरण्याचा सुरवातीचा दिनांक | ०२/०७/२०२५ |
| २. | आवेदन पत्र / शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | ०१/०८/२०२५ |

**१) पदाचे नांव :- पहारेकरी (Watchman) एकुण पदे ६२, वेतन श्रेणी - एस १ : १५०००-४७६००**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | साशैमाव | आदुघ | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ०९ | ०४ | ०१ | ०१ | ०३ | ०१ | ०२ | १३ | ०८ | ०७ | १३ | ६२ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ०४ | ०२ | ०१ | ०१ | ०२ | ०१ | ०१ | ०५ | ०४ | ०३ | ०५ | २९ |
| महिला | ०३ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०० | ०१ | ०४ | ०२ | ०२ | ०४ | १८ |
| खेळाडू | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०१ | ०२ |
| माजी सैनिक | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०१ | ०१ | ०२ | ०८ |
| पदविधर अंशकालीन कर्मचारी | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०५ |
| भुकंपग्रस्त | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| दिव्यांग | एकुण पदे - ०२<br>१ पद, LV-Low vision (अल्पदृष्टी) या प्रकाराकरीता<br>१ पद D-Deaf, HH-Hearing Handicapped (कर्णबधीर) या प्रकाराकरीता | | | | | | | | | | | |
| अनाथ | ०१ संस्थात्मक | | | | | | | | | | | |

| २) पदाचे नांव :- मजूर, गुराखी,परिचर,दोग्धा, पशुधन परिचर,पुस्तक वाहक, फराश, सफाई कामगार व तत्सम पदे एकुण पदे ३०७, वेतन श्रेणी - एस १ : १५०००-४७६०० | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्रवर्ग** | अ.जा. | अ.ज. | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | साशैमाव | आदुघ | खुला | एकुण |
| **पदसंख्या** | ४४ | २८ | १० | १० | १३ | ०८ | ०९ | ८० | ४९ | ४९ | ०७ | ३०७ |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे** | | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | १७ | १२ | ०४ | ०४ | ०५ | ०४ | ०४ | ३० | १९ | १९ | ०३ | १२१ |
| **महिला** | १३ | ०८ | ०३ | ०३ | ०४ | ०२ | ०३ | २४ | १५ | १५ | ०२ | ९२ |
| **खेळाडू** | २ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०४ | ०२ | ०२ | ०० | १२ |
| **माजी सैनिक** | ७ | ०४ | ०१ | ०१ | ०२ | ०१ | ०१ | १२ | ०७ | ०७ | ०१ | ४४ |
| **पदविधर अंशकालीन कर्मचारी** | ४ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ८ | ०५ | ०५ | ०१ | ३० |
| **भुकंपग्रस्त** | १ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०२ | ०१ | ०१ | ०० | ८ |
| **दिव्यांग** | एकुण १२ पदे<br>१) ३ पदे LV-Low vision (अल्पदृष्टी) या प्रकाराकरीता<br>२) ३ पदे D-Deaf, HH-Hearing Handicapped (कर्णबधीर) या प्रकाराकरीता<br>३) ४ पदे OA-One Arm, OL- One Leg, DW-Dwarfism, AAV- Acid Attack Victim (अस्थिव्यंगता) या प्रकाराकरीता<br>४) २ पदे स्वमग्नता (Autism Spectrum Disorder) (M-Mild, MoD-Moderate), ID-Intelectual Disability, विशिष्ट शिक्षण अक्षमता (Special Learning Disability) मानसिक आजार, (Mental Illness) तसेच बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व | | | | | | | | | | | |
| **अनाथ** | एकुण -०३ (०२संस्थात्मक, ०१ संस्थाबाहय) | | | | | | | | | | | |

**संक्षिप्त** :- अजा - अनुसूचित जाती, अज - अनुसूचित जमाती, विजा - विमुक्त जाती, भज - भटक्या जमाती, विमाप्र - विशेष मागास प्रवर्ग, इमाव - इतर मागास प्रवर्ग, आदुघ- आर्थिकदृष्टया दुर्बल घटक, साशैमाव - सामाजिक आणि शैक्षणीक मागासवर्ग

## २. शैक्षणिक अर्हता व परीक्षा पध्दती खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | पदाचे नांव | किमान शैक्षणीक अर्हता | परीक्षा पध्दती |
|---|---|---|---|
| १. | पहारेकरी | १. इयत्ता ०७ वी उत्तीर्ण, सुदृढ प्रकृती असणारा<br>२. माजी सैनिकांना प्राधान्य | ६० गुणांची व्यावसायिक चाचणी व ४० गुणांची शारिरीक क्षमता चाचणी. |
| २. | मजुर | इयत्ता ४ थी उत्तीर्ण व संबंधित क्षेत्रातील अनुभव असल्यास प्राधान्य | ६० गुणांची व्यावसायिक चाचणी व ४० गुणांची शारिरीक क्षमता चाचणी. |

शासन निर्णय दिनांक ४ मे २०२२ मधील तरतुदी अन्वये गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवारांने एकुण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

३. **वयोमर्यादा**

| वयोमर्यादा गणना दिनांक | किमान वय | कमाल वयोमर्यादा (सदरची जाहिरात प्रकल्पग्रस्तांसाठी असल्यामुळे खालील प्रवर्ग सोडुन इतर प्रवर्गासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील.) | | |
|---|---|---|---|---|
| ०१-०८-२०२५ | १८ वर्षे | माजी सैनिक | | पदविधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार |
| | | अराखीव (खुला) प्रवर्ग | राखीव (मागासवर्गीय/आदुघ/ अनाथ) प्रवर्ग | |
| | | ३८ + सशस्त्र दलातील सेवेचा कालावधी अधिक ०३ वर्षे | ४३ + सशस्त्र दलातील सेवेचा कालावधी अधिक ०३ वर्षे | ५५ |

वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिका-याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक (एस.एस.सी.) शालांत परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र किंवा अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.

४. **ऑफलाईन अर्ज सादर करण्याबाबत सुचना :-**

१. पात्र उमेदवाराने विद्यापीठाचे www.vnmkv.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली जाहिरात काळजीपुर्वक वाचुन सोबत दिलेला नमुना डाऊनलोड करुन विहीत नमुन्यात ऑफलाईन अर्ज सादर करावा. प्रस्तुत पदांसाठी अर्ज फक्त ऑफलाईन पध्दतीनेच स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही पध्दतीने प्राप्त झालेला अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

२. आवेदन /परीक्षा शुल्क नियंत्रक,भरती खाते वनामकृवि, परभणी (Comptroller, recruitment account VNMKV Parbhani) या नावे State Bank Of India, VNMKV campus, Parbhani Branch Code 20317 IFSC Code SBIN0020317 या शाखेवर काढलेला विहीत रक्कमेचा धनाकर्ष / डिमांड ड्रॉफ्ट (D.D.) अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. इतर माध्यमाद्वारे भरलेले शुल्क ग्राहय धरले जाणार नाही. तसेच भरलेले आवेदन शुल्क ना-परतावा आहे.

३. परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

४. माजी सैनिक/दिव्यांग उमेदवार यांना परीक्षा/भरती प्रक्रिया शुल्कात सूट देण्यात येत आहे.

५. ऑफलाईन अर्ज प्रत्यक्ष उमेदवारानी कुलसचिव कार्यालय, वनामकृवि, प्रशासकीय इमारत, परभणी येथे आवक विभागात कार्यालयीन वेळेत घेण्यात येईल.

५. **निवड पध्दती / परीक्षेचे स्वरूप**

१. व्यावसायीक चाचणी व शारीरिक क्षमता चाचणी इत्यादीबाबतचे स्वरूप शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक ०४/०५/२०२२ मध्ये विहीत केल्यानुसार राहिल.

२. उमेदवारांच्या पात्र / अपात्र याद्या, ऑफलाईन परीक्षेचा निकाल, गुणवत्ता याद्या, प्रतिक्षा याद्या, तसेच या संबंधी वेळोवेळी प्रसिध्द करावयाच्या सुचना / वेळापत्रक, माहीती अटी व शर्ती हया विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. भरती प्रक्रीये दरम्यान वेळोवेळी संकेतस्थळ पाहून भरती प्रक्रीयेच्या माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

६. **आवेदन /परीक्षा शुल्क**

| अ.क्र. | प्रवर्ग | आवश्यक शुल्क |
|---|---|---|
| १. | अराखीव (खुला) प्रवर्ग | १,०००/- रू. |
| २. | मागास प्रवर्ग/आर्थिकदृष्टया दुर्बल घटक/अनाथ | ९००/- रू. |

७. **महिला आरक्षण :-**

१. महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवास (Domicile) प्रमाणपत्रासह नमुद करणे आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावर निवडीकरीता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट महिला व बाल विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक महिआ २०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ४ मे, २०२३ नुसार रद्द करण्यात आली आहे. तथापी, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गातील इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडुन वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याबाबतच्या तरतुदी लागु राहतील.

२. शासन निर्णय क्र.८२/२००१ मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५.०५.२००१ नुसार महिलांसाठीचे आरक्षण हे ज्या प्रवर्गात दर्शविण्यात आले आहे त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षण अदलाबदल न करता त्याच प्रवर्गातील अन्य पात्र उमेदवारांमधुन पदे भरण्यात येतील.

८. **खेळाडू आरक्षण**

१. प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रिडा विषयक विहीत अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रामाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पुर्वीचे असणे बंधनकारक आहे.

२. खेळाडू प्रवर्गातुन निवडीस पात्र असलेल्या उमेदवारांची क्रिडा प्रमाणपत्रे पुन:पडताळणीसाठी संबंधित उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा, यांचे कार्यालयाकडे पाठविण्यात येतील आणि त्यांचे कडुन वैध खेडाळू प्रमाणपत्रे पडताळणी अहवाल दिल्याशिवाय विद्यापीठ सेवेत नियुक्ती दिली जाणार नाही.

३. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे दिनांक ०१ जुलै, २०१६, १८ ऑगस्ट, २०१६, ३० जुन, २०२२ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच, वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

९. **दिव्यांग आरक्षण**

१. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६, दिनांक २९ मे, २०१९ अन्वये या संदर्भात शासनाकडुन वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तीच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदर शासन निर्णयानुसार दिव्यांगासाठी आरक्षीत पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश तो ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गात करण्यात येईल.

२. कृषि, पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र.संकीर्ण १५२०/प्र.क्र.११३/६ अे, दिनांक १८ मे, २०२१ नुसार दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार या विद्यापीठातील आस्थापनेवरील पदे दिव्यांग शासन सेवेसाठी सुनिश्चित केली आहेत. त्यानुसार उमेदवार संबंधित पदासाठी अर्ज करण्यात पात्र राहतील.

३. संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकाराचे प्रमाण किमान ४० टक्के दिव्यांगत्व प्रमाणपत्र धारक असलेले उमेदवार आरक्षाणासाठी तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी / सवलतींसाठी पात्र राहतील. दिव्यांग व्यक्तींसाठी ठेवलेले आरक्षण समांतर आरक्षण आहे. तथापी, दिव्यांग व्यक्तीची निवड झाल्यानंतर त्यांच्या नियुक्तीपुर्वी तज्ञ वैद्यक मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करू शकेल असे प्रमाणपत्र दिल्यावरच त्यांची नियुक्ती करण्यात येईल.

४. दिव्यांग कल्याण विभाग शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०२४/प्र.क्र.८६/दि.क.२, दिनाक २७ जुन २०२४ अन्वये दिव्यांग आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी उमेदवाराकडे वैश्विक ओळखपत्र (Unique Disability Identity Card - UDID) असणे बंधनकारक आहे.

01/07/24

५. दिव्यांग व्यक्तींसाठी जाहीरातीमध्ये असलेली पदे तसेच दिव्यांग उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग उमेदवाराची गुणवत्ता क्रमांकानुसार शिफारस करण्यात येईल.

६. प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र दिव्यांग उमेदवारांना, लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने अर्ज सादर करतेवेळी आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रांसह विद्यापीठाकडे लेखी विनंती करून पुर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. अर्जामध्ये मागणी केली नसल्यास तसेच विद्यापीठाची विहित पध्दतीने पुर्व परवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

७. उमेदवाराने स्वतः लेखनिकाची व त्याच्या मानधनाची व्यवस्था करावी. संबंधित लेखनिकाच्या परीक्षा केंद्रावरील उपस्थितीबाबतची जबाबदारी उमेदवाराची राहील. लेखनिक उपस्थित नसल्याच्या कारणास्तव ऐनवेळी लेखनिकाची व्यवस्था विद्यापीठामार्फत केली जाणार नाही. तसेच, लेखनिक म्हणुन मदत देणारी व्यक्ती एकाच परीक्षेसाठी एकापेक्षा जास्त उमेदवारांना लेखनिक म्हणुन काम करणार नाही याची दक्षता उमेदवाराने घ्यावी.

८. लेखनिकाच्या गैरवर्तनाची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. लेखनिक व उमेदवार यांच्या मधील संभाषणामुळे परीक्षेची शांतता कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही अथवा इतर उमेदवारांची एकाग्रता भंग होणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

९. लेखनिकाने स्वतः प्रश्न सोडवू नये अथवा उमेदवारास कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन वा सुचना करू नयेत. उमेदवाराकडुन तोंडी सुचविण्यात येणारे उत्तर लेखनिकाने नमुद करणे एवढेच आवश्यक राहील उमेदवार व लेखनिक या दोघांनी नियमांचे उल्लंघन केल्यास किंवा त्यांनी मुलभूत माहिती दडविली असल्याचे निष्पन्न झाल्यास निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारी रद्द केली जाईल.

**१०. अनाथ आरक्षण**

१. अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्रमांक अनाथ २०२२/प्र.क्र.१२२/का ०३, दिनांक ६ एप्रिल २०२३, दिनांक १० मे, २०२३ तसेच या संदर्भात शासनाकडुन वेळोवेळी पारीत करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

२. अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गातुन करण्यात येईल.

**११. माजी सैनिकांकरीता आरक्षण**

१. माजी सैनिकांकरीता आरक्षणासंदर्भातील तरतुदी शासनाकडुन वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार असतील.

२. शासन निर्णय राआधो ४०२४/प्र.क्र.१४/१६-अ, दिनांक २५ जानेवारी, २०२४ नुसार समांतर आरक्षणासाठी राखुन ठेवलेल्या जागेवर सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास या संबंधात प्रचलित शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**१२. भुकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण**

१. भुकंपग्रस्त आरक्षणासंदर्भातील तरतुदी शासनाकडुन वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार असतील.

२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २७ ऑगस्ट, २००९ तसेच, यासंदर्भात शासनाकडुन वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार भुकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

**१३. पदविधर / पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी**

१. शासकीय कार्यालयात तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेले व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये नोंद केलेले पदविधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार यांचेकडे नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

२. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक अंशका १९९३/प्र.क्र.५७/२०१३/१६-अ, दिनांक १९ सप्टेंबर, २०१३ नुसार पदविधर/पदविधारक अंशकालीन उमेदवारांमधुन शासकीय/निमशासकीय सेवेतील नियुक्तीसाठी असलेले १० टक्के आरक्षण हे समांतर आरक्षण असल्यामुळे या घटकासाठी जाहिरातीत दर्शविलेल्या आरक्षित पदांसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास ती पदे गुणवत्तेनुसार उपलब्ध अन्य पात्र उमेदवारांमधुन भरण्यात येतील.

01/07/2025

## १४. प्रकल्पग्रस्त उमेदवारांना आवेदन करण्याकरीता सर्वसाधारण सुचना व अटी / शर्तीः-

१. प्रकल्पग्रस्त धाराकांना शासकीय सेवेत सामावुन घेण्याचा संबंधात शासन निर्णय क्र.एईएम-१०८०/३५/१६-अ, दि.२१ जानेवारी, १९८० मधील तरतुदी तंतोतंत लागू राहतील.

२. या जाहीरातीच्या अनुषंगाने अर्ज करणारा उमेदवार हा केवळ वनामकृवि प्रकल्पग्रस्त असावा. विद्यापीठ प्रकल्पग्रस्त असल्याबाबत संबंधीत जिल्हा पुर्नवसन अधिकारी यांच्याकडील विहीत नमुन्यातील वैध प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची सुस्पष्ट सत्यप्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. ज्या उमेदवारांचे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र यापुर्वीच अवैध ठरविण्यात आलेले आहेत. अशा उमेदवारांनी अर्ज करु नये.

३. अर्ज करणाया उमेदवारांने कुटूंबातील मुळ प्रकल्पग्रस्त व्यक्तीपासून वंशावळ सादर करणे आवश्यक आहे. तसेच प्रकल्पग्रस्त कुटूंबातील विद्यापीठ / शासकीय सेवेत या आधारे नोकरीला लागलेला नाही याबाबतचे प्रतिज्ञा पत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

४. अर्जदार उमेदवारांने स्वतः किंवा कुटूंबातील व्यक्तीने संपादीत मालमत्ता किंवा ताबा विद्यापीठास प्रत्यक्षात दिलेला असला पाहीजे व अशा ताबा पत्राची प्रत उमेदवारांने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५. उमेदवारास एकापेक्षा अधिक संवर्गासाठी अर्ज करावयाचे असल्यास अशा प्रत्येक संवर्गासाठी स्वतंत्र अर्ज सादर करावा. त्यासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील.

६. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग, सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील उमेदवारांना सदर सामाजिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी संबंधित उमेदवारांकडे अर्ज स्विकृतीचे अंतिम दिनांकास वैध असलेले नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील (EWS) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे २०२१ विहित करण्यात आलेली प्रमाणपत्र, अर्ज करतेवेळी सादर करणे आवश्यक राहील. अद्ययावत नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, अर्ज स्विकृतीचे अंतिम दिनांकास वैध असलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

७. सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ठ प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

८. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील उमेदवारांच्या नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र सत्यता पडताळणीबाबत महाराष्ट्र शासन इतर मागास बहूजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२१/प्रक्र.२९७/मा.व.क. दिनांक २६.०४.२०२२ मधील निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल. सदर आरक्षणांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याच्या नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी संबंधित प्राधिकरणाकडून केल्यानंतर नियुक्ती देण्यात येईल.

९. विविध मागास प्रवर्ग, महिला, प्राविण्य प्राप्त खेडाळू, अनाथ इत्यांदीसाठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाकडुन वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

१०. विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतर परिवर्तनीय असुन आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवारांचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

११. अर्ज करतांना एखादी जात/जमात राज्य शासनाकडुन आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केले असल्यास तसेच सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवारांकडे उपलब्ध असेल तर संबंधित जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

१२ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण -१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि राआधो ४०२४/प्र.क्र.१४/१६-अ, दिनांक २५ जानेवारी, २०२४ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

१३. कोणत्याही प्रकारंच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी (वनामकृवि प्रकल्पग्रस्त) असणा-या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. यासाठी शासनाकडील सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास (Domicile Certificate)अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. सर्वसाधारण रहिवासी संज्ञेला भारतीय लोक प्रतिनिधित्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

१४. समांतर आरक्षणा अंतर्गत निवड झाल्यास सक्षम प्राधिकरणाकडून प्रमाणपत्र पडताळणी झाल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल.

१५. मागासवर्गीय उमेदवारांना संबंधित आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास विहित प्राधिका-याने निर्गमित केलेले जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१६. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२.१२.२०११ मधील तरतुदीनुसार याचिका क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकावर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २५.०८.२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एस.एल.पी. मधील आदेशाच्या अधिन राहुन तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासुन ०६ महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१७ **निवड झालेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांचे सक्षम अधिकारी यांचेकडील मुळ प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणा-या अधिकारी यांचे कार्यालयाकडुन प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र पडताळणी तसेच उमेदवारांच्या कुटूंबामधुन यापुर्वी सदरील प्रमाणपत्राच्या आधारे लाभ घेतला किंवा नाही याबाबतच्या स्पष्ट अहवालानुसारच नियुक्ती आदेश देणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.**

१८. प्रकल्पग्रस्त आरक्षणाचा लाभ न घेता राज्य शासकीय, निमशासकीय कृषि विद्यापीठ कर्मचारी/स्थानीक स्वराज्य संस्था इत्यादीमध्ये कायम आस्थापनेवर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांनी अर्ज भरतांना संबंधित कार्यालय प्रमुखांचा ना-हरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहील.

१९. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २८.०३.२००५ ची अधिसुचना नुसार उमेदवाराने अर्ज करण्याच्या दिनांकास २८.०३.२००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या व हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक नसावी याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

२०. **उमेदवारांने अर्जासोबत भरलेल्या शैक्षणिक व इतर अर्हता, सामाजिक प्रवर्ग, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, ईत्यादी सर्व कागदपत्राची छायांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.** तसेच उमेदवाराने व्यावसायीक चाचणी तसेच शाररीक क्षमता चाचणीमध्ये मिळविलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार विचारक्षेत्रातील उमेदवारांना कागदपत्रे पडताळणी करीता बोलाविण्यात येईल, त्यावेळेस उमेदवाराने अर्ज सादर करतांना ज्या कागदपत्राची अर्जासोबत छायांकित प्रती सादर केलेल्या आहेत, ती कागदपत्रे मुळ प्रतीवरुन पडताळणी अंतीच ग्राहय धरण्यात येतील. तसेच कागदपत्र पडताळणीकरिता बोलविण्यात आल्यास निवड झाली असा उमेदवाराला दावा करता येणार नाही.

२१. उमेदवारांना लेखी परिक्षा, शाररीक क्षमता, व्यावसायीक चाचणी, तसेच कागदपत्र पडताळणीकरीता स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

२२. उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील.

२३. उमेदवारा विरूध्द फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्यास किंवा पुर्वी एखादया प्रकरणात फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावली असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती द्यावी. खरी माहिती दडवुन ठेवल्यास, प्रशासनाचे निदर्शनास आल्यास कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराची नियुक्ती अपात्र ठरविण्यात येईल.

२४. उमेदवाराने नावातील बदलाबाबत राजपत्र / विवाह नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२५. प्रस्तुत जाहीरातीमधील आरक्षणाची पदे ही अंतिम बिंदू नामावली तपासणीच्या अधिन राहुन देण्यात येत आहे. तसेच जाहीरातीमधील रिक्त पदे कमी / वाढ तसेच जाहीरातीमधील भरतीचे संपूर्ण अधिकार विद्यापीठाकडे राहील.

२६. भरती प्रक्रिया दरम्यान जर एखादया उमेदवांराने सादर केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळुन आल्यास अशा उमेदवाराचा अर्ज भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यात अपात्र ठरविण्यात येईल.

२७. जाहिरातीतील कोणत्याही पदावर निवड करून घेण्यासाठी उमेदवाराने अयोग्य मार्गाचा अवलंब केल्यास संबंधित उमेदवाराला भरती प्रक्रियेतुन अपात्र ठरविणेत येईल.

01/03/2025

२८. वरील वेळापत्रकामध्ये काही बदल झाल्यास, सुधारित वेळापत्रक वृत्तपत्राव्दारे व विद्यापीठाच्या **www.vnmkv.ac.in** संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात येईल.

२९. परीक्षा शुल्क भरतांना दिलेल्या सुचनांनुसारच भरण्यात यावे.

३०. सदर जाहिरात ही केवळ वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी प्रकल्पबाधितांकरीता निर्गमित करण्यात येत असून इतर प्रकल्पातील कुठल्याही प्रकल्पबाधित व्यक्तींनी सदर जाहिरातीमध्ये अर्ज करू नये. अर्ज केल्यास तो ग्राहय धरल्या जाणार नाही.

३१. शासन निर्णय वित्त विभाग क्र.सीपीएस-१००५/१२६/एसईआर-४, दिनांक ३१.१०.२००५ नुसार १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त होणाऱ्या विद्यापीठ कर्मचाऱ्यांसाठी **परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS)/ राष्ट्रीय निवृत्ती योजना (NPS)/ युनिफाईड पेन्शन योजना (UPS)** लागू राहील.

३२. सदर नियुक्तीनंतर दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी लागू राहील.

३३. नियुक्तीच्या वेळी संबंधीत उमेदवारांने रु.५००/- च्या बंधपत्रावर अर्जासोबत सादर केलेले वंशावळ प्रमाणपत्र नोटरी करुन सादर करणे बंधनकारक राहील.

01/07/25

(संतोष वेणीकर)
कुलसचिव
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,
परभणी

# <u>अर्जाचा नमुना</u>

| उमेदवाराचा अलीकडील काळातील पासपोर्ट आकाराचा |
|---|

| उमेदवाराची स्वाक्षरी |
|---|

**प्रति,**

कुलसचिव,

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी -४३१ ४०२

**विषय :-** ------------------------------------- **या पदाकरीता अर्ज**

**संदर्भ** :- विद्यापीठ जाहिरात क्रमांक-२/ जा.क्र.वनामकृवि/साप्रवि/प्रकल्पग्रस्त/गट-ड/२२९७/२०२५ दिनांक ०१जुलै,२०२५

**उमेदवाराची माहिती**

१. उमेदवाराचे संपुर्ण नांव :- (प्रथम आडनाव) --------------------------------------------------------

२. वडीलांचे/पतीचे संपुर्ण नांवः- ------------------------------------------------------------------------

३. पदाचे नांवः- ------------------------------------------------------------------------------------------

४. आवेदन / परीक्षा शुल्क रक्कम रुपये ----------------------------------------------------------------

धनाकर्ष क्रमांक व दिनांक ----------------------------------------------------------------------------

५. सध्याचा पत्रव्यवहारासाठी पत्ता :- ------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------------

६. कायमचा पत्ता : ------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------------

७. दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक :- ----------------------------------------------------------------------

८. ई मेल आय डी :- ----------------------------------------------------------------------------------

९. जन्मतारीख (अंक व अक्षरामध्ये) :- --------------------------------------------------------------------

१०. अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकाच्यावेळी असलेले वय :- (वर्ष -------- महिने ------- दिवस --------)

११. उमेदवाराची जात/प्रवर्ग :- -------------------------------------------

(अ.जा./अ.ज./विजा-अ/भज-ब/भज-क/भज-ड/विमाप्र/इमाव/साशैमाव/आदुघ/अराखीव इ.)

१२. कोणत्या प्रवर्गासाठी अर्ज केला आहे :- --------------------------------------------------------------------

१३. उमेदवार महिला / खेळाडू / माजी सैनिक / पदवीधर अंशकालीन कर्मचारी/ भूकंपग्रस्त / दिव्यांग / अनाथ यापैकी समांतर आरक्षणासाठी अर्ज करीत असल्यास प्रकाराचे नांव :- -----------------------------

**(दिव्यांग-लक्षणीय दिव्यांगत्व असल्यास अनुग्रह कालावधी व लेखनिकाची मदत घेण्यासंदर्भात दिव्यांग आरक्षण अट क्र. ६ नुसार कार्यवाही करावी.)**

१४. **प्रकल्पग्रस्त माहिती**

| मुळ प्रकल्पबाधित व्यक्तीचे नाव | अर्जदाराचे प्रकल्पबाधित खातेदाराशी नाते | प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक | गावाचे नाव | संपादित क्षेत्र (हे.) सर्व्हे नं. व गट नं. | संपादित केलेल्या जमीनीचा संपुर्ण ताबा सोडला आहे काय? (होय/नाही) | प्रकल्पग्रस्त म्हणुन यापुर्वी कुटूंबातील इतर व्यक्ती सेवेत असल्यास त्यांचे नांव व पदनाम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

विद्यापीठ प्रकल्पग्रस्त असल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याने निर्गमित केलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र अर्जासोबत जोडुन प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक उक्त रकान्यात नमुद करावा.

१५. **शैक्षणीक अर्हता :-**

| अ.क्र. | उत्तीर्ण परिक्षेचे नांव | शाळा/बोर्ड/विद्यापीठ नांव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | एकुण प्राप्त केलेले गुण | गुणांची टक्केवारी | वर्ग / श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |

१६. **अनुभव (अनुभव असल्यास सोबत अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.)**

| अ.क्र. | नियोक्त्याचे नाव | धारण केलेले पद व वेतनश्रेणी | कालावधी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासुन (दिनांक) | पर्यंत (दिनांक) | एकुण कालावधी | | |
| | | | | | वर्ष | महिने | दिवस |
| १. | | | | | | | |
| २. | | | | | | | |

१७. विवाहीत असल्यास शासन अधिसुचना २८ मार्च, २००५ नुसार कुटूंबाचा तपशील अर्जाच्या दिनांकास असलेल्या मुला / मुलींची माहितीसह सोबतच्या प्रतिज्ञापत्रामध्ये नमुद करावे.

१८. माहितीच्या सत्यतेसाठी उमेदवारांने खालील प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

(अर्जदाराची स्वाक्षरी, नांव व दिनांक)

## प्रमाणपत्र

मी, याव्दारे प्रतिज्ञापुर्वक असे जाहिर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपुर्वक, तसेच विश्वासपुर्वक दिली असुन, ती सत्य आणि बरोबर आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणीक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळुन लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास, तसेच उपरोक्त दिलेल्या माहितीच्या आधारे नियुक्ती झालेली असल्यास सेवेतुन कमी केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहाणार नाही. अर्जाव्दारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास विद्यापीठ माझ्याविरूध्द कायदेशिर कारवाई करू शकते याची मला जाणीव आहे.

(अर्जदाराची स्वाक्षरी, नांव व दिनांक)

ठिकाण :-
दिनांक :-     /     /२०२५

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र)**
**नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना - अ (नियम ४ पहा)**

मी, श्री/श्रीमती/कुमारी -------------------------------------------------- श्री. ---------------------------------------------- यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय --------- वर्ष राहणार ------------------------------------------------------------------------ याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो /करते की,

१. मी --------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला ------------------------------- (अपत्यांची संख्या) इतकी हयात मुले / मुली आहेत. त्यापैकी दिनांक २८.०३.२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ----------- आहे. (असल्यास जन्मदिनांक नमुद करावा.)

३. हयात असलेल्या अपत्याची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८.०३.२००५ नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे मी अपात्र ठरविण्यात येईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-     /     /२०२५                                        अर्जदाराचे नांव व स्वाक्षरी

(नांव :- ----------------------------------------------)